# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### उस्मानाबाद जिल्ह्यात 'राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान' योजनेचा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाभ मिळणेबाबत

**(१) १९५७ (२२-१२-२०१४). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्याला अपघात झाल्यास त्याच्या पालकाला अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यातून अशा किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली व त्यापैकी किती लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे तसेच उर्वरित लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन २०१४ पासून आतापर्यंत एकूण ९३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून त्यापैकी ६१ लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ प्रदान करण्यात आलेला आहे व उर्वरीत ३२ लाभार्थ्यांना निधी प्राप्त होताच लाभ देण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात तंबाखू मुक्त शाळा अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२) ४०६४७ (२५-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३० जिल्ह्यातील जवळपास १३ हजार २२० शाळा तंबाखू मुक्त करण्यासाठी सलाम बॉम्बे फाऊंडेशन सन २००२ पासून सुरवात केली असता केवळ २३४ शाळा तंबाखू मुक्त असून त्यापैकी मुंबईत फक्त २ तंबाखू मुक्त शाळा आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात तंबाखू मुक्त शाळा अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) शासनाच्या दिनांक ०७ जुलै. २०१५ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी असून याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायद्यानुसार रु.२००/- पर्यंत दंड आकारण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्लास्टिकच्या अतिवापरावर निर्बंध आणण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत**

**(३) ७४१३६ (०६-०५-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांविरूद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला मा.पर्यावरण मंत्री यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिकमुळे आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने या प्लास्किटच्या पिशव्यांवर निर्बंध आणण्याकरीता व प्लास्टिक विरोधात जनजागृती मोहिम राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर निर्बंधाचे नेमके स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रादेशिक अधिकारी स्तरावर राज्यातील प्लास्टिक कॅरी बॅग उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र पथके तयार केली आहेत. सदर तपासणी पथकांमार्फत केल्या जाणाऱ्या तपासणीमध्ये दोषी आढळणाऱ्या कारखान्यांवर कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील ॲमेझॉन या ऑनलाईन व्यवसाय करणाऱ्या संस्थेवर कारवाई करण्याबाबत**

**(४) ७४१६६ (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ॲमेझॉन ऑनलाईन व्यवसाय करणारी संस्था विदेशी गुंतवणूक नियमाचे सर्रास उल्लंघन करून नागपूर (जि.नागपूर) शहरातील ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरामध्ये वैध मापन शास्त्र वजन व मापे विभागाने ॲमेझॉन या संस्थेचा रूपये २ लक्ष ९७ हजारांचा माल जप्त केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियमाचे सर्रास उल्लंघन करणा-या विदेशी कंपन्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-१०-२०१७) :**(१) विदेशी गुंतवणूक नियमाबाबतची कार्यवाही केंद्रिय वित्त मंत्रालय व केंद्रिय औद्योगिक मंत्रालय यांच्या अखत्यारीत येते. तथापि, वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आलेले आहे हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.नागपूर जिल्ह्यातील निरीक्षक, वैध मापन शास्त्र, हिंगणा-१व हिंगणा-२ विभाग यांनी मे.ॲमेझॉन सेलर सर्व्हीस प्रा.लि.मिहान, खापरी यांच्याकडून रू.३,२५,१६०/- किंमतीच्या अवैध आवेष्टीत वस्तू जप्त केल्या आहेत.

(३) संबंधीतांवर आवेष्टीत वस्तू नियमांचा भंग केल्याबाबत खटले दाखल केले असून त्यांचेविरूद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(५) ७५३५५ (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेसहित राज्यातील विविध शिक्षक संघटनांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी राज्यव्यापी संप केला व दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी याच मागणीसाठी मोर्चे काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती योजना लागू करावी व त्यांची भविष्य निर्वाह निधी कपात करावयाची रक्कम भरण्यात यावी असा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भोर (जि.पुणे) तालुक्यातील डोंगरी भागात वसलेल्या गावे व वस्त्यांच्या तात्पुरत्या स्वरुपात नळपाणी पुरवठा योजनांना निधीसह मंजूरी देण्याबाबत

**(६) ७५९३३ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावे, वस्त्या या डोंगरी भागात वसलेल्या असून त्यांना पिण्याच्या पाण्याची उन्हाळयात टंचाई भासत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांच्या तात्पुरत्या स्वरुपात नळपाणी पुरवठा योजनांना निधीसह मंजूरी देण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पुणे यांना दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एक लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त पत्राची दखल घेऊन सदर गावांत तात्पुरत्या स्वरुपात नळपाणीपुरवठा योजनांना मंजूरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. सदर गावांची पाहणी केली असता खालील बाबी आढळून आल्या.

मौ. पळसोशी, कांबरे वे. खो. (सुकाळेवस्ती) महुडे बु. (गावठाण, व आखाडेवस्ती, पाले, वडतुंबी (सुतारवस्ती) या ठिकाणी उन्हाळयात उद्भव कोरडे झाल्याने पाणी टंचाई भासते. त्यामुळे त्या गावांमध्ये तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना करणे आवश्यक आहे.

तथापि, ग्रामपंचायतीचे मागणीपत्र तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या पुरक टंचाई कृती आराखडयास मान्यता घेणे या बाबीस विलंब झाला. तसेच शासन निर्णय दि. ०७.०५.२०१४ नुसार ३१ मार्च नंतर तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना क्षेत्रिय स्तरावर मंजूरी देता येत नाही. त्यामुळे मंजूरी देता आली नाही.

मा.विधानसभा सदस्य यांनी सुचविलेल्या तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनांच्या कामांचा पुढील ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ च्या टंचाई कृती आराखडयात तत्कालीन टंचाई परिस्थिती पाहून समावेश करुन त्यांना मान्यता देता येईल.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील ईदगाह कत्तलखाने बेकायदेशीरपणे सुरु असल्याबाबत**

**(७) ७७०३५ (२०-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेच्या नियंत्रणात असलेला ईदगाह कत्तलखाना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले होते त्याची गंभीर दखल घेऊन राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्या आदेशानुसार उक्त कत्तलखाना बंद करून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक/उपप्रादेशिक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशुवधगृह बेकायदेशीरपणे चालवणाऱ्या उत्तरदायी व्यक्ती, भिवंडी-निजापूर महापालिकेचे आयुक्त आणि संबंधित अधिकारी यांच्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुन्हे दाखल करावेत यासाठी हिंदु जनजागृती समितीने मा. पर्यावरण राज्यमंत्री, महाराष्ट्र यांच्याकडे पत्राद्वारे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त पत्राच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

(३) मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.२३.०३.२०१६ रोजी सदरचा कत्तलखाना बंद करण्याचे आदेश बजावले असून सदर कत्तलखाना सद्य:स्थितीत बंद आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील नळपाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(८) ७७३९३ (२०-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या रुपये १२,८९,८३,१२०/- एवढया रकमेच्या नळपाणी पुरवठा योजनेला दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी शासन निर्णय काढून अंतिम मान्यता देऊनही केंद्र शासनाकडून निधी न मिळाल्यामुळे आजतागायत निविदा काढून काम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार नळपाणी पुरवठा योजनेची निविदा काढून सदर नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक किती आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांअंतर्गत सन २०१५-१६ च्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत केंद्रशासनाचे निर्देशांनुसार शासनपत्र दि.३०.६.२०१५ अन्वये सन २०१५-१६ मधील सुरु न झालेल्या योजनांची कामे पुढील आदेश होईपर्यंत हाती घेण्यात येवू नये असे निर्देश आहेत. केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे सदर योजनेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

तथापि, सदर गावाचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत केला असून या गावाकरीता रु.११,०७,५०,८०७/- एवढ्या रक्कमेस शासनाने प्रशासकीय मान्यता दिली असून सदर योजनेकरीता रु.५,६०,४३,३१४/- या किंमतीच्या ई निविदा मागविण्यात आल्या असून मान्यतेसाठी निविदा समितीकडे सादर करण्यात आल्या आहेत.

(३) सदर योजनेची अंदाजपत्रकीय किंमत रु.१२,८९,८३,१२०/- एवढी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा परिषदेला निधी मिळूनही शौचालयाच्या बांधकामाचे उद्विष्ट प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ७९२९० (१८-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात शौचालय बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानापोटी परभणी जिल्हा परिषदेला दोन वर्षात १५ कोटी ५२ लाख १९ हजार रुपयाचा निधी मिळूनही शौचालयाचे बांधकामाचे उद्दिष्ट प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शौचालय बांधकामासाठी आलेला ८ कोटी १८ लाख १६ हजार रुपयांचा निधी पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(४) असल्यास, चौकशीनुसार शौचालय बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-१०-२०१७)** :(१) सन २०१२ च्या सर्वेक्षणानुसार परभणी जिल्हयासाठी १,८८,६६३ शौचालय बांधकामाचे उद्दीष्ट होते, त्यापैकी १,२८,६३५ शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे.
(२) सन २०१५-१६व २०१६-१७ या वर्षामध्ये प्राप्त झालेल्या रूपये ६०कोटी ८३ लक्ष ४ हजार निधीपैकी रूपये ३७ कोटी ६७ लक्ष ३० हजार इतके खर्च करण्यात आले असून रूपये २३ कोटी १५ लक्ष ७४ हजार एवढा निधी मार्च २०१७ जिल्हा परिषद परभणीकडे शिल्लक होता.
(३) व (४) परभणी जिल्हयासाठी शौचालय बांधकामाचे उद्दीष्टापैकी शिल्लक ६००२८ शैाचालयाचे बांधकाम करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद औद्योगिक वसाहतीतील कारखान्यातील सांडपाण्यामुळे जलसाठे प्रदूषित होत असल्याबाबत.**

**(१०) ७९४३५ (२०-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद औद्योगिक वसाहतीत असलेल्या मोठ-मोठया कंपन्याकडून सांडपाण्याचे नियोजन केले जात नसल्याने उक्त कारखान्यातील सांडपाण्यामुळे येथील भूजल विषारी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दूषित पाण्याच्या वापरामुळे शहरात नागरिकांच्या आजाराचे व त्वचा रोगाचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जलसाठे प्रदूषित करणा-या कारखान्यांना दुप्पट दंड आकारुन त्यांचा पाणीपुरवठा खंडीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहूलगांव खाडी, चेंबूर, (मुंबई) येथे होणारी अनधिकृत भरती बांधकामे थांबविणे तसेच पर्यटन दृष्टया विकास करणेबाबत**

**(११) ८२००५ (२०-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूलगांव खाडी, चेंबूर (मुंबई) येथे होणारी अनधिकृत भरती बांधकामे थांबविणे, तसेच पर्यटन व पर्यावरण दृष्टया विकास करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी वा सुमारास मा.पर्यावरण मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी यांच्या समवेत सदर ठिकाणाची स्थळ पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयासाठी अन्न व औषध विभागाचे स्वतंत्र मुख्यालय स्थापन करण्याबाबत**

**(१२) ८३८३१ (२०-०४-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा वेगळा होऊन १८ वर्ष पूर्ण होत आहेत तरीही अनेक शासकीय कामे परभणी येथूनच मुख्यालय म्हणून कामकाज करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध विभाग कार्यालय देखील परभणी येथेच असून त्यामुळे गुटख्यासह विविध संदर्भातील कारवाया पोलीस करत असून अन्न व औषध विभागाचे अधिकारी यांच्या मार्फत जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्हयासाठी अन्न व औषध विभागाकरिता स्वतंत्र मुख्यालयाची नितांत गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने हिंगोली जिल्हयासाठी स्वतंत्र अन्न व औषध विभागाचे मुख्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हिंगोली येथे अन्न व औषध प्रशासनाचे स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यासाठी जागा ताब्यात घेण्यात आली आहे. तसेच हिंगोली येथील प्रशासनाच्या स्वतंत्र कार्यालयासाठी आवश्यक असणारी वर्ग-१ ते वर्ग-४ ची एकूण १२ नवीन पदे मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावाचा समावेश सुधारीत आकृतीबंधात (प्रस्तावित) करण्यात आला असून तो मंजूर करून घेण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शिधावाटप दुकानदारांच्या वाहतूक रिबेट मध्ये वाढ करण्याबाबत**

**(१३) ८४७९६ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिधावाटप दुकानदारांच्या वाहतूक रिबेट मध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

तथापि दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ अन्वये लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्य वितरणासाठी अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानदाराच्या वाहतुक रिबटमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंच्या शासकीय गोदाम ते स्वस्त धान्य दुकाने या दुसऱ्या टप्प्यातील वाहतुकीसाठी देण्यात येत असलेल्या वाहतूक रिबेटचा दर, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र व पुणे, नागपुर, सोलापूर महानगरपालिका क्षेत्रे (अंतर विचारात न घेता) प्रति क्विंटल रु.१४.५८ तसेच गोदामापासून २० किमी पर्यंत अंतर असल्यास रु.१६.५३ व गोदामापासून २० कि.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास रु.१९.४४ इतका ठेवण्यात आलेला आहे.

सदर दर हे ज्या वस्तुंची व्दारपोच योजनेअंतर्गत वाहतुक केली जात नाही, अशा वस्तुंसाठी पण लागू राहतील.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथील ८ हजार रेशनकार्डधारक धान्यापासून वंचित असल्याबाबत**

**(१४) ८४८५३ (२१-०८-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथे अन्न सुरक्षा कायद्यातून वंचित राहिलेल्या दारिद्रय रेषेवरील कार्डधारकांना धान्य देण्यासाठी नव्याने यादी बनविण्याचे निर्देश दिनांक१७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अन्न नागरी पुरवठा विभागाने दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने प्रत्येक गावातील १५० कार्डधारकांची यादी बनवून तिला ग्रामसभेची मान्यता घेऊन तहसिलदार, मालवण यांच्या सहीने प्रसिध्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याचसंदर्भात माहे मार्च, २०१७ मध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाने काढलेल्या, दुसऱ्या आदेशात १५० पैकी केवळ ७० कार्डधारकांनाच धान्य देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या या बदलेल्या नियमामुळे ८ हजार नवीन कार्ड धारकांना धान्यापासून वंचित रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर कार्डधारकांना धान्य देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (०४-१०-२०१७) :**(१) दिनांक १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंतच्या लाभार्थ्यांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक ३ मार्च, २०१७ अन्वये दिनांक ३०.०९.२०१६ रोजी अस्तित्वात असलेल्या लाभार्थ्यांच्या आधारे राज्यातील सर्व जिल्ह्यांना सुधारीत इष्टांक दिला असून, त्यानुसार मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथील ११०४ शिधापत्रिकांवरील ३३६६ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली.

(४) व (५) सदर निवड करण्यात आलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ नियमितपणे देण्यात येत आहे. आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यानंतर निवडलेल्या पात्र लाभार्थ्यांकरिता इष्टांक देण्यात येईल.

---

**मालाड (पूर्व), दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील, वॉर्ड क्र. ३८, ३९, ४२ या प्रभागातील नागरीकांना विशेष मोहिम राबवून शिधापत्रिका वितरीत करण्याबाबत**

**(१५) ८५२१५ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील मालाड (पूर्व) भागात वॉर्ड क्र. ३८, ३९, ४२ या प्रभागात अनेक वर्षापासून वास्तव्य करीत असलेल्या वन विभागाच्या जागेतील नागरीकांना स्वस्त धान्य योजनेचा लाभ मिळण्याकरिता विशेष मोहिम राबवून शिधापत्रिका वितरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांना दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नागरिकांना शिधापत्रिका मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सन्माननीय विधान सभा सदस्य, श्री. सुनिल प्रभु यांची ग परिमंडळ कार्यालयातील अधिकारी व शिधावाटप कार्यालय, ४२ ग मालाड येथील सहाय्यक शिधावाटप अधिकारी यांनी समक्ष भेट घेऊन सदर विभागातील नागरिकांचे चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात आले असून त्या नागरिकांना सदर विभागात शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात केशरी शिधापत्रिका उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांची झालेली गैरसोय

**(१६) ८५६९३ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात गत तीन महिन्यांपासून तहसिल कार्यालयातील सेतू विभागात केशरी शिधापत्रिका उपलब्ध नसल्यामुळे तेथील ४००-५०० नागरिकांची गैरसोय होत असून त्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सेतू कार्यालयातील एका कागदाला शिधापत्रिकेची पुरवणी जोडून पुरवठा अधिकाऱ्यांच्या सही शिक्याने तात्पुरत्या स्वरूपात शिधापत्रिका देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नागरिकांना केशरी शिधापत्रिका मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-१०-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
तहसिल कार्यालय, पनवेल येथे माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत केशरी शिधापत्रिका मिळण्यासाठी २८१ अर्ज प्राप्त झालेले होते. सदर तालुक्यात व जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांच्याकडेही कोऱ्या शिधापत्रिका उपलब्ध नसल्याने व नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी तात्पुरत्या स्वरूपात (नवीन, दुय्यम व विभक्त) पुरवणी शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या होत्या.

तथापि, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, यांच्याकडून १५०० केशरी शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यात आल्यापासून सदर पुरवणी शिधापत्रिका रद्द करून अर्जदारांना नियमानुसार केशरी शिधापत्रिका वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील उसप शाळेची वाडी या परिसरात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१७) ८५७३५ (२१-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील उसप शाळेची वाडी या परिसरात तीव्र पाणी टंचाई व पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणी टंचाई दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु झाला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रेशन व्यवस्था सक्षमिकरणासाठी तामिळनाडू, छत्तीसगड राज्यांच्या धर्तीवर राज्यात अन्न महामंडळाची स्थापना करण्याची मागणी**

**(१८) ८६४२१ (२१-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रेशन व्यवस्था सक्षमीकरणासाठी तामिळनाडू, छत्तीसगड राज्यांच्या धर्तीवर राज्य शासनाने अन्न महामंडळाची स्थापना करण्याची मागणी रास्त धान्य दुकानदार संघटनेने जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न सुरक्षा कायदा, २०१३ आल्यानंतर त्याची अंमलबजावणी माहे फेब्रुवारी २०१४ पासून होवूनही अद्याप रेशनकार्ड धारकांचे फॉर्म, बँक खाते, आधार कार्डासह वेळोवेळी भरुन दिलेल्या माहितीमध्ये त्रुटी आढळल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने यावर उपाय म्हणून रेशन व्यवस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी अन्न महामंडळाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) शिधापत्रिकांच्या Digitized data चे validation व Verification करताना त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत. आता, ePDS-DCS या संगणक प्रणाली मार्फत सदर काम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) तामिळनाडू, छत्तीसगड येथे अभ्यास दौरा करुन महामंडळ स्थापन करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रास्तभाव धान्य व रॉकेल दुकानदारांच्या मागण्याबाबत**

**(१९) ८७१४५ (२१-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली, मालवण, कुडाळ व सावंतवाडी तालुक्यात शासनाच्या रास्तभाव योजनेंतर्गत धान्य वितरण करणा-या दुकानदार व रॉकेल दुकानदार यांनी त्यांच्या मागण्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्या दिनांक ३० एप्रिल, २०१७ पर्यंत मान्य न झाल्याने दिनांक ०३ मे, २०१७ पासून रास्तभाव धान्य दुकानदार व रॉकेल दुकानदार संघटनेच्या वतीने धान्य व रॉकेलची उचल करण्यात येणार नसल्याचे निवेदनही संघटनेने जिल्हा पुरवठा अधिका-यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रास्तभाव धान्य दुकानदार व रॉकेल परवानाधारकांच्या मागण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकान व किरकोळ केरोसीन परवानाधारक यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.१६.५.२०१७ रोजी मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. संघटनांच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या

अनुषंगाने झालेल्या सकारात्मक चर्चेअंती जिल्हातील परवानाधारकांनी दिनांक १७.०५.२०१७ पासून पुकारलेला संप मागे घेतला. या बैठकीचे इतिवृत्त संबंधितांना पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) तालुक्यातील पेयजल योजनांची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(२०) ८७३३२ (२१-०८-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील पेयजल योजनांची कामे अपूर्ण असल्याने गावात निर्माण झालेल्या पाणी टंचाईसाठी गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या बैठकीत माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रांत अधिकारी, ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व उक्त तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त ८ गावांच्या पाण्याची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१०-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

मा.आमदार, जिंतूर-सेलू विधानसभा मतदार संघ यांचे अध्यक्षतेखाली दि. ०१/०४/२०१७ रोजी सेलू तालुक्यातील पाणी टंचाईबाबत बैठक घेण्यात आली होती.

त्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत सेलू तालूक्यातील १२ गावांपैकी मौ. पिंपळगाव गोसावी येथील योजनेचे काम अपूर्ण असल्याने तेथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली होती.

(२) मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही केली असल्याने चौकशीची आवश्यकता नाही. मौ.पिंपळगाव गोसावी येथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि. १२.०५.२०१७ च्या आदेशान्वये मंजुरी देण्यात आली.

तसेच सेलू तालुक्यातील १.गुळखंड, २.नागठाण कुंभारी, ३.डिग्रस जाहांगीर, ४.पिंपळगाव गोसावी, ५.केमापूर, ६.गव्हा, ७.कुपटा व ८.निरवाडी खु. या गावांतील ग्रामपंचायतींनी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी प्रस्ताव सादर केले होते.

त्यापैकी १.गुळखंड, २.नागठाण कुंभारी, ३.डिग्रस जाहांगीर व ४.पिंपळगाव गोसावी या ४ गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला. तर उर्वरित १.केमापूर, २.गव्हा, ३.कुपटा व ४.नरवाडी खु. या ४ गावांमध्ये अन्य स्त्रोतांमार्फत पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोटेवाडी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई**

**(२१) ८७४७९ (२१-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटेवाडी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने सन २०१२ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेतून २८ लाख ६० हजार रुपये खर्चाची नवीन नळ पाणीपुरवठा योजना राबवली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावासाठी यापूर्वी तीन-तीन नळ पाणीपुरवठा योजना राबवूनही गेली कित्येक वर्षे गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच ग्रामस्थांनी शासनाकडे अनेकवेळा तक्रारी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे घर बांधकाम, लग्न समारंभ, याकरीता टँकरने पाणी विकत घ्यावे लागत असून पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे महिला वर्ग व गावकरी यांना पिण्याच्या पाण्याकरीता वणवण भटकावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणी कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पुरक उद्भव फये लघु पाटबंधारे तलावाच्या खालील बाजूस आहे. तलावातून पाणी सोडणे बंद असलेल्या काळात पाणी टंचाई भासते.

(३) हे खरे नाही.

मार्च २०१६ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत पूरक योजना कार्यान्वित करणेत आली.गेल्या दोन वर्षात टंचाई कार्यक्रमातून २ विंधन विहिरी घेण्यात आल्या.

(४) हे अंशत: खरे आहे.

गावामध्ये मागील ५ वर्षात शासनामार्फत टँकरने पाणी पुरवठा केलेला नाही. तथापि उन्हाळयामुळे (माहे एप्रिल व मे मध्ये) गावात मुबलक पाणी उपलब्ध होत नसलेने, मोठया खाजगी समारंभासाठी अथवा बांधकामासाठी काही लोक वैयक्तिक पर्यायी व्यवस्था करतात.

(५) सदर गावामध्ये पुरेशे व मुबलक पाणी उपलब्ध असून कोठेही पाणी टंचाई नाही.

---

**नांदेड जिल्हयातील पाणीटंचाईच्या कृती आराखडयावर कार्यवाही झाली नसल्याबाबत**

**(२२) ८७५९१ (२१-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होत असल्याने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी माहे डिसेंबर ते फेब्रुवारीसाठी शासनाने तयार केलेल्या कृती आराखड्यावर अद्यापपर्यन्त कार्यवाही झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील पाणी टंचाई संदर्भात शासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-१०-२०१७)** :(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बागलाण (जि.नाशिक) येथे निर्माण झालेली पाणी टंचाई

**(२३) ८७६७४ (२१-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण विधानसभा मतदार संघामध्ये (जि.नाशिक) गेली ५ वर्ष पाऊस कमी पडल्याने दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे माहे जानेवारी, २०१७ पासून अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे त्यांना टँकरने पाणी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, मा.पालक मंत्री, जिल्हाधिकारी नाशिक यांना दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत माहे एप्रिल व मे महिन्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होऊन सुध्दा शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणी पाणी पुरवठा करण्याबाबत व टंचाई काळात टँकर सुरु करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी ऐवजी तहसिलदार यांना देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

बागलाण तालुक्यात मागील पाच वर्षात सन २०१५ वगळता सरासरी पेक्षा जास्त पर्जन्यमान झालेले आहे. मात्र बागलाण तालुक्यातील काही भागात कमी पर्जन्यमानामुळे टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) मागणीअंती आवश्यक तेथे टंचाईअंतर्गत उपाययोजना करुन पाणी पुरवठा करण्यात आला असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच मागणी प्रमाणे आवश्यक तेथे जिल्हाधिकारी स्तरावरुन टँकर सुरु करण्याची कार्यवाही होत असल्याने टँकर सुरु करण्याचे अधिकार तहसिलदार यांना देण्यात आलेले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐनी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील ग्रामस्थांनी मंजूर पेयजल योजनेचे काम त्वरित सुरु करण्यासाठी राधानगरी तहसिल कार्यालयावर काढलेला मोर्चा**

**(२४) ८७६८० (२१-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐनी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील ग्रामस्थांनी मंजूर पेयजल योजनेचे काम त्वरित सुरु करावे व नियमित आरोग्य सुविधा मिळावी तसेच अन्य मागण्यांसाठी राधानगरी तहसिल कार्यालयावर माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन तहसिलदार यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
मौ. ऐनी गावासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम आराखडा सन २०१४-१५ मधून योजना मंजूर होती. त्यानुसार पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ऐनी यांनी दि.१६.०५.२०१५ रोजी निविदा प्रसिध्द केली होती. तथापि केंद्र शासनाने दि.२९.०६.२०१५ व २९.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार सदर योजनेची निविदा प्रक्रिया स्थगित करणेत आली.
तद्नंतर मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ. ऐनी नळ पाणीपुरवठा योजनेस दि.०७.०८.२०१७ रोजी मंजूरी देण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील तसेच अमरावती विभागातील चार जिल्हयांमध्ये हजारो शिधापत्रिका अन्न सुरक्षा योजनेतून वगळण्यात आल्याबाबत**

**(२५) ८७९४० (२१-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील तब्बल ३६८३ शिधापत्रिकांधारकांना तसेच अमरावती विभागातील चार जिल्हयांमधील हजारो शिधापत्रिकाधारकांना शासनाने दिनांक १७ डिसेंबर, २०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार अन्न सुरक्षा योजनेतून वगळण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे उक्त शिधापत्रिकाधारकांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथे राष्ट्रीय पेयजल योजना पूर्ण करण्याबाबत**

**(२६) ८८४९५ (२१-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेतून पाणी पुरवठा योजना सन २०१४-१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकवेळा केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना ग्रामपंचायतीस देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजनेचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१४-१५ अंतर्गत सदर योजनेस रु.१,३२,३७,५००/- एवढया किंमतीस मंजुरी देण्यात आलेली आहे.

(२) नाही.

योजनेतील किरकोळ कामे वगळता इतर कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत व गावास पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

याबाबत लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त नाही.

(४) नाही.

योजनेतील किरकोळ कामे पूर्ण झाल्यावर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात येईल.

(५) नाही.

सदर योजनेचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत होत असल्यामुळे योजनेतील किरकोळ कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस उप अभियंता, पाचोरा यांनी सूचना दिलेल्या आहेत. विलंबाबाबत प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील सुमारे ६५० गावांत निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई**

**(२७) ८८७६६ (२१-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील सुमारे ६५० गावांत माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान व २९२ गावांत माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील पाणीटंचाई निवारणार्थ शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर फक्त ९ गावात व माहे मे, २०१७ अखेर ३७९ गावात पाणी टंचाई निर्माण झाली होती.

(२) माहे मे, २०१७ अखेर पाणी टंचाई निवारणार्थ आवश्यकतेनुसार ३७९ गावात ४९२ उपाययोजना पूर्ण करण्यात येवून पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणीटंचाईबाबत**

**(२८) ८८८८१ (२१-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील ८१ विहिरी नादुरुस्त अवस्थेत असून तीव्र पाणी टंचाईने बळी जाऊन सुद्धा प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी याची दखल घेत नसल्याचे दिनांक २३ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच पाणीटंचाईबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

मोखाडा तालुक्यात मार्च ते जून २०१७ अखेर २८ गावे व ६० पाडयात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. सदर टंचाईवर मात करण्यासाठी २८ गावे व ६० पाडयांना २२ टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

तसेच या तालुक्यात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात/ घेण्यात आल्या आहेत :-

१. ०८ गावे/पाडयात विंधन विहीरी वरुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

२. सन २०१५-१६ ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत ४ सौर नळ पाणी पुरवठा व ५ साधी विहीर योजना प्रस्तावित असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

३. सन २०१६-१७ मध्ये ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत ५ सौर नळ पाणी पुरवठा योजना व १४ साधी विहीर बांधणे योजना प्रस्तावित आहेत. सदर योजनांवर पुढील कार्यवाही सुरु आहे.

४. सन २०१७-१८ अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या कृती आराखडयात एकूण ९ योजनांचा समावेश करण्यात आला असून मोखाडा तालुक्यातील एकूण २१ गावे/पाडे (ज्या गावपाडयांत पाणी टंचाई उद्भवते) सदर योजनेत समाविष्ट आहेत.

५. तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ मध्ये मोखाडा तालुक्यातील एकूण २ योजना प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदरु व आंधळगाव (ता.मंगळवेळा, जि.सोलापूर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजना नियोजनाअभावी बंद असल्याबाबत

**(२९) ८८९७५ (२१-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात १० गावांना नळपाणी पुरवठा करणारी नंदरू व आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना नियोजनाअभावी बंद पडली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केलेली ही योजना ज्या गावांना आहे त्या गावांना इतर दुसरी कोणती योजनाही राबविता येत नसल्यामुळे या योजनेखाली असलेल्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भोसे पाणीपुरवठा योजनेचे काम संथगतीने सुरु असल्यामुळे नागरिकांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील १० गावांना चाचणी स्वरुपात पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. उर्वरीत सर्व गावांना टप्प्या-टप्प्याने माहे डिसेंबर २०१७ अखेर पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाडेगाव (जि.अकोला) परिसरात स्वस्त धान्य दुकानदारांकडून धान्याची चढया दराने विक्री होत असल्याबाबत

**(३०) ९०४६२ (२१-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडेगाव (जि.अकोला) परिसरातील स्वस्त धान्य दुकानदार लाभार्थ्यांना डावलून धान्याची चढया दराने विक्री करीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी वरिष्ठ अधिका-यांचे दुर्लक्ष होत असून लाभार्थ्यांवर धान्य वाटपात अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर व धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
माहे मे, २०१७ मध्ये वाडेगांव करीता नियतनानुसार ३७० क्विंटल गहू व ३९०.५० क्विंटल तांदुळ वाटप करण्यात आला. रास्तभाव दुकानाच्या अभिलेख व सी फॉर्मसी पडताळणी केली असता मे,२०१७ मधील शिल्लक साठा वजा करुन माहे जून,२०१७ चे नियतन मंजूर करण्यात आले. तसेच परिसरातील शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या चौकशी अंती त्यांना चढया भावात विक्री होत नसल्याचे निदर्शनास आले.

मे,२०१७ मध्ये वाडेगांव परिसरातील रास्तभाव दुकानदाराबाबत कुठलीही तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अन्नसुरक्षा योजनेच्या लाभापासुन वंचित असलेल्या शिधापत्रिकाधारकांना बाझारभावाच्या निम्या किंमतीत जिन्नस उपलब्ध करून देण्याची मागणी**

**(३१) ९०९२२ (२१-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्नसुरक्षा योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या केशरी शिधापत्रिकाधारकांना गहू, तादूंळ, खाद्यतेल, साखर व डाळ हे ५ जिन्नस बाजारभावाच्या निम्या किंमतीत उपलब्ध करून देण्याची मागणी राज्यातील वेगवेगळया संघटनांनी, लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शिधापत्रिकांचे आधार लिंकींग व संगणकीकरण पुर्ण झाल्यानंतर रद्द होणाऱ्या बोगस शिधापत्रिकांचा धान्यांचा कोटा केशरी शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्याचे आश्वासन मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी वेळोवेळी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक २ फेब्रुवारी २०१४ पासून अन्न सुरक्षा योजना सुरु केली दारिद्र रेषेखालील नागरिकांचा या योजनेत समावेश करण्यात आला असून पाच किलो मर्यादेत रेशन धान्याचा पुरवठा केला जातो मात्र अनेक रेशन दुकानात वेगळी कारणे सांगून लाभार्थ्यास धान्य देण्यास टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रेशन दुकानदारांकडून यादीत बोगस लाभार्थ्याची व दुबार नावे टाकून लाभार्थ्याच्या नावावरील धान्य काळ्याबाजारात विकले जाते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार केशरी शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१०-२०१७) :**(१) होय.
(२) दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश होणार आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यातील आधार सिडींग केलेल्या वाटप बेसमधील शिधापत्रिकांचे क्लिनिंग व व्हॅलिडेशनचे काम सुरु आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर यादीतील दुबार नावे आपोआप वगळली जातील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार-नालासोपारा (जि.पालघर) येथे फेरीवाले वैधमापनाच्या अधिकृत वजनाऐवजी दगडाचा वापर करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याबाबत**

**(३२) ९१२८६ (२१-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई - विरार - नालासोपारा (जि.पालघर) येथील फेरीवाले वस्तूंचे मोजमाप करताना वैद्यमापनाच्या अधिकृत वजनाऐवजी दगडाचा वापर करुन ग्राहकांची फसवणूक होत आहे व याप्रकरणाकडे वैधमापन अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ग्राहकांची फसवणूक करणा-या फेरीवाल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) याबाबत तक्रार प्राप्त नसतानाही निरीक्षक, वैध मापन शास्त्र, वसई विभाग यांनी एप्रिल, २०१६ ते एप्रिल, २०१७ या कालावधीत वसई-विरार-नालासोपारा येथील ६४ फेरीवाल्यांवर त्यांच्याकडील वजने व मापे याची विहीत मुदतीत फेरपडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्यामुळे कारवाई केली आहे.तसेच याच कालावधीत वसई विरार नालासोपारा येथील १३६ फेरीवाले यांच्याकडील ५८२ वजन मापांची फेरपडताळणी व मुद्रांकन करून रू.८,१६०/- पडताळणी व मुद्रांकन शुल्क वसूल केले आहे.

(३) या प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**वारंघुशी (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावामध्ये प्रधानमंत्री उज्वल योजने अंतर्गत देण्यात आलेल्या अनुदानित गॅस कनेक्शनबाबत**

**(३३) ९१२९७ (२१-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यात आदिवासी व दारिद्र्य रेषेखालील असलेल्या कुटूंबाला पंतप्रधान उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून मोफत गॅस देण्याच्या योजनेची अंमलबजावणी अधिकारी व गॅस एजन्सीच्या उदासीन धोरणामुळे सदर योजना यशस्वी झाली नसल्याने आदिवासींना स्वयंपाकासाठी जंगलातून लाकडे आणून चुलीवर स्वयंपाक करावा लागत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंघुशी (ता.अकोले, जि.अहमदनगर) या आदिवासी गावामध्ये प्रधानमंत्री उज्वल योजने अंतर्गत अनुदानित गॅस कनेक्शन देण्यात आले असून सदर योजना १०० टक्के अनुदानित असताना गॅस एजन्सी लाभार्थ्यांकडून रु.१७४१ घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना अयशस्वी झाल्याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे दिनांक ५ जून, २०१७ रोजी व गॅस एजन्सी लाभार्थ्यांकडून पैसे घेत असल्याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी व गावक-यांनी जिल्हाधिकारी, यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा दरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व लाभार्थ्यांना उक्त योजनेंतर्गत मोफत गॅस कनेक्शन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-०९-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) “पंतप्रधान उज्ज्वला योजना” या योजनेअंतर्गत दिले जाणारे गॅस कनेक्शन हे नि:शुल्क नाही. या योजनेअंतर्गत “लोन” आणि “नो-लोन” या दोन प्रकारात गॅस कनेक्शन उपलब्ध करुन दिले जातात.

“लोन” प्रकारात सुरुवातीस लाभार्थ्यांकडून रु.१००/- घेवून गॅस कनेक्शन उपलब्ध करुन दिले जाते आणि उर्वरित रक्कम त्यानंतरच्या गॅस सिलेंडर रिफिल दरम्यान लाभार्थ्यास अनुदान न देता वसूल केली जाते.

“नो-लोन” प्रकाराची रक्कम ही प्रत्येक महिन्याला संबंधित तेल कंपनीच्या धोरणानुसार बदलत असल्याने ती प्रत्येक महिन्याला वेगवेगळी असते. याबाबत माहे मे, २०१७ मध्ये पुढील प्रमाणे आहे. १) दोन बर्नर शेगडी रु.९९०/- २) गॅस रिफिलिंग रु.६५१/- ३) राज्य सरकार स्टँप डयुटी रु.१००/- असे एकूण रु.१७४१/- अशी नो-लोन प्रकाराची रककम वसूल करण्यात आली आहे. तथापि लाभार्थ्यास तेल कंपनीकडून रिकामा गॅस सिलेंडर, रेग्युलेटर, गॅस पुस्तक, सुरक्षा नळी व प्रशासकीय फी इ. नि:शुल्क उपलब्ध करुन दिले जाते.

या बाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे श्री.सोमा धोंडू भांगरे, रा.खडकी, ता.अकोले यांनी दिनांक ०७ जून, २०१७ रोजी अर्ज सादर केलेला असून, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी तहसिलदार अकोले यांचेकडे क्र.पुरवठा/कार्या१८/४८/२०१७ दिनांक ०७/०७/२०१७अन्वये पाठविण्यात आला होता. तथापि श्री.सोमा धोंडू भांगरे या नांवाची व्यक्ती मौजे खडकी खुर्द व खडकी बु या दोन्ही महसूली गावात आढळून येत नसल्याचा पंचनामा ग्राम अधिकारी तथा तलणि मौजे खडकी ता.अकोले, जि.अहमदनगर यांनी दि.०१/०९/२०१७ रोजी सादर केलेला आहे. तसेच सेल्स ऑफिसर,बी.पी.सी.एल. आणि एच.पी.सी.एल. यांनी श्री.सोमा धोंडू भांगरे या नावाने प्रधानमंत्री उज्जवला योजनेतून गॅस कनेक्शन दिलेले नाही. त्यामूळे श्री.सोमा धोंडू भांगरे यांच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे चौकशी अंती तहसिलदार, अकोले यांनी दि.०५/०९/२०१७ च्या पत्रान्वये स्पष्ट केले आहे.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील केसरी कार्ड धारकांना शिधावाटपाच्या धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(३४) ९१४११ (२१-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील केसरी कार्ड धारकांना माहे जानेवारी २०१७ पासून शिधावाटपाच्या धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त केसरी कार्ड धारकांना धान्य पूरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१०-२०१७) :**(१) प्राधान्य कुटुंबातील केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्यापासून वंचित राहावे लागल्याची बाब माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुका खरेदी विक्री संघाचे वतीने शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या धान्य गोदामाचे भाडे व भात खरेदी कमिशनची रक्कम शासनाकडे थकीत असल्याबाबत**

**(३५) ९१५९९ (१७-१०-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीने शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या धान्य गोदामाचे भाडे व भात खरेदी कमिशनचे सुमारे ३४ लाख रुपये गत दोन वर्षापासून शासनाकडे थकीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकीत रक्कमेमुळे चिपळूण तालुका खरेदी विक्री संघाने दोन वर्षे भात खरेदी न करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसा सदर थकीत रक्कम अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२४-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबतचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव विभागाकडून दिनांक २३.१२.२०१६ रोजी वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास अनुसरून वित्त विभागाने विचारणा केलेल्या माहितीसह हा प्रस्ताव वित्त विभागाकडे दिनांक १३.०७.२०१७ रोजी मान्यतेसाठी फेरसादर करण्यात आला होता. तथापि वित्त विभागाने पुन्हा उपस्थित केलेल्या मुद्द्याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर खुलाशासह प्रस्ताव पुन:श्च वित्त विभागाच्या मान्यतेस सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट व समुद्रपूर ( जि.वर्धा)या तालुक्यांतील स्वस्त धान्य दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य मिळत असल्याबाबत**

**(३६) ९२४८० (२१-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट व समुद्रपूर (जि.वर्धा) या तालुक्यांतील स्वस्त धान्य दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य मिळत असूनही याकडे अन्न नागरी पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार स्वस्त धान्य दुकानांची व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

जिल्हयातील हिंगणघाट, समुद्रपूर किंवा इतर कोणत्याही तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानामध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य मिळत असल्याचे निदर्शनास आले नाही किंवा तसे धान्य मिळत असल्याबाबत कसल्याही प्रकारची तक्रार चालू आर्थिक वर्षात जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा कार्यालयात प्राप्त झाली नाही.

तसेच स्थानिक अन्न नागरी पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत नाही. भारतीय खाद्य निगमकडून पुरविण्यात येणारे धान्य ट्रकमध्ये भरतेवेळी शहानिशा करुन चांगलेच धान्य भरण्यात येते व नजरचुकीने खराब धान्य गोदामात आल्यास खराब धान्याचे पोते भारतीय खाद्य निगमला परत करण्यात येते व बदलून चांगले धान्य घेण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील गांवे व वाडया-वस्त्यांवर टंचाईची शक्यता घोषित करुन टंचाई आराखडा जाहीर केला असल्याबाबत**

**(३७) ९२५४३ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील ३५७ गांवे व १ हजार ५५८ वाडया-वस्त्यांवर टंचाईची शक्यता घोषित करुन रूपये २१ कोटी २० लाखांचा टंचाई आराखडा जाहीर केला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आराखडा जाहीर करुन ४ महिन्यांचा कालावधी होऊनही टंचाई आराखडयात शासनाने ठरवून दिलेल्या नऊ उपाययोजना करावयाच्या असतात ही कामे आराखडयानुसार पूर्ण करण्यात आली नसतांनाच जिल्हा परिषदेने पुरवणी आराखडा पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, त्यानुषंगाने टंचाई आराखडयातील कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-१०-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) मंजुर मुळ आराखडयाप्रमाणे माहे जून २०१७ अखेर कार्यवाही करण्याची मुदत होती. तथापि, माहे एप्रिल २०१७ मध्ये मंजूर टंचाई आराखडयात समाविष्ट करावयाच्या ०९ उपाययोजनांमध्ये नव्याने अतिरिक्त मागणी आल्यानुसार पुरवणी टंचाई आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

पुणे जिल्हयामधील पिण्याचे पाण्याची टंचाई निवारणार्थ माहे एप्रिल २०१७ ते जून २०१७ या कालावधीचा २०० गावे व १३५१ वाडयांचा रक्कम रु. १५४३.०७ लाख इतक्या किंमतीचा पुरवणी टंचाई आराखडा माहे जून २०१७ मध्ये मंजूर झाला आहे. पाणी टंचाई कृती आराखडे हे संभाव्य असतात. सदर संभाव्य कृती आराखडयातील ज्या-ज्या गावे/वाडयांमध्ये पाणी टंचाई निर्माण होते तेथे-तेथे आवश्यक त्या टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा योजना घेण्यात येतात.

(३) कार्यवाही केली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मंजुर मुळ आराखडयानुसार पाणी टंचाईग्रस्त गावांकरिता रु. ३४९.३० लाख किंमतीच्या एकूण ५२७ योजना पुर्ण करण्यात आल्या आहेत.

तसेच मंजूर पुरवणी आराखडयानुसार टंचाईअंतर्गत रु. ४८.७१ लाख किंमतीच्या एकूण २५ योजना पुर्ण करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोर (ता.जि.पुणे) येथील डोंगरी भागात पाण्याची तीव्र टंचाई असल्याने टँकर मागणीच्या प्रस्तावाबाबत**

**(३८) ९२५६१ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (ता.जि.पुणे) येथील डोंगरी भागात पाण्याची तीव्र टंचाई असल्याने याबाबत टँकर मागणीचा प्रस्ताव देऊनही ग्रामसेवक, तलाठी, पाणीपुरवठयाचे अधिकारी यासंदर्भातील आवश्यक प्रस्ताव पाणीपुरवठा अधिका-यांना देत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा बिनचूक प्रस्ताव संबंधित पाणीपुरवठयाचे अधिकारी वरिष्ठ कार्यालयास देत नसुन अधिकारी, कर्मचारी यांच्या चुकांमुळे तीन महिन्यांपासून मागणी करुनही पाणी उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गळनिंब (ता.नेवासे, जि.अहमदनगर) पाणी योजनेच्या दूरूस्तीबाबत**

**(३९) ९२६१९ (२१-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गळनिंब (ता.नेवासे, जि.अहमदनगर)येथील पाणी योजना सतत गळतीमुळे कायमची बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणी योजनेच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-१०-२०१७)** :(१)हे खरे नाही.

(२) गळनिंब (ता.नेवासे, जि.अहमदनगर) येथील योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत सन १९९८-९९ मध्ये सुरु होऊन सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर योजना उप अभियंता व गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांचेमार्फत ठेकेदाराद्वारे चालविण्यात येत आहे. मुळ योजनेमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलशुध्दीकरण केंद्रावर एक व अशुध्द पाणी उपसा केंद्रावर एक रोहित्र बसविण्यात आले होते. सदर रोहित्र जळल्यावर पाणी पुरवठा बंद पडू नये म्हणून जिल्हा परिषद देखभाल व दुरुस्ती निधीमधून जलशुध्दीकरण केंद्रावर एक व अशुध्द पाणी उपसा केंद्रावर एक अतिरिक्त रोहित्र बसविण्यात आले आहे. सन २०१५-१६ च्या पाणी टंचाई काळामध्ये टंचाई निवारण निधीमधून जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्ती, पाईपलाईन दुरुस्ती व पंपीग मशीनरी बसविणे इ. रु.४७.४८ लक्ष रुपयांची कामे पूर्ण करुन उपअभियंता व गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचेमार्फत योजना चालविण्यात येत आहे.

योजनेच्या अशुध्द पाणी उपसा वाहिनीची लांबी ७२०० मीटर असून त्यापैकी २५०० मीटर लांबीची पाईपलाईन काळया मातीच्या भागात असून शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांमुळे गंजत असल्यामुळे सतत पाईपलाईन लिकेज होते व पाणी पुरवठा बंद होतो. सदर दुरुस्ती कामाचा पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजनांचा कृती आराखडा सन २०१६-१७ मध्ये समावेश करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत योजनेचे रु.७६.०० लक्ष विद्युत देयक थकल्यामुळे दि.२०.०७.२०१७ पासून पाणी पुरवठा योजना बंद आहे.

(३)प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्हयातील सोनई- करजगांव व इतर १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन बेकायदेशीर असल्याबाबत

**(४०) ९२६२६ (२१-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील सोनई- करजगांव व इतर १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास माजी लोकप्रतिनिधी यांनी केलेले उद्घाटन बेकायदेशीर असल्याचे पत्रक जीवन प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारणी, चिखलदरा, तिवसा व भातुकली (जि.अमरावती) या तालुक्यातील गावामधील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(४१) ९२९७९ (२१-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) या आदिवासी तालुक्यातील २५ गावात भीषण पाणीटंचाई असून नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून जिल्हा परिषद अमरावती मार्फत गावाला केवळ एकच टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तिवसा व भातकुली (जि.अमरावती) या तालुक्यातील १०५ गावे पूर्णत: खारपाण पट्टयातील असून या गावांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असल्याने या गांवाची पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी मा.जलसंधारण मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी, तिवसा यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रश्न भाग (२) मधील निवेदनावर तसेच चिखलदरा आणि धारणी तालुक्यातील आदिवासी जनतेला कायमस्वरुपी स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१७) :**(१) सन २०१७ च्या उन्हाळयामध्ये पाणी टंचाई निवारणार्थ अमरावती जिल्हयातील चिखलदरा तालुक्यातील १२ गावामध्ये ७ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) धारणी व चिखलदरा तालुक्यातील जनतेला कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यासाठी सद्यस्थितीत २९२ स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना कार्यरत असून, ८३१ हातपंप, १३ विजपंप व २५ दुहेरी पंप कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वैध मापन शास्त्र विभागातील अपु-या मनुष्यबळामुळे ग्राहकांची व्यापा-यांकडून होणारी फसवणूक**

**(४२) ९३००३ (२१-०८-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैध मापन शास्त्र विभागातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे ग्राहकांची बाजारातील व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक रोखण्यास शासन अपयशी ठरत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात शहरातील २ हजार व्यापा-यांमागे १ निरीक्षक, १ फिल्ड सहायक व १ शिपाई अशी रचना करण्यात आली परंतु ग्राहक व व्यापा-यांची संख्या लक्षात घेता उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांची वजनमापाची तपासणी करीता आवश्यकता असताना शासनामार्फत अद्यापपर्यंत मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागात मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे तपासणी व कार्यवाहीतून शासनास मिळणारा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैध मापन शास्त्र विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता या विभागात नवीन पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-१०-२०१७) :**(१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

वैधमापन शास्त्र विभागात मनुष्यबळ कमी असले तरी ग्राहकांची बाजारातील व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक रोखण्यासाठी या यंत्रणेतील मनुष्यबळ पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे.

उपलब्ध मनुष्यबळाकडून ग्राहकांच्या हितरक्षणासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या कार्यपध्दतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, काळानुरुप मनुष्यबळात बदल, मनुष्यबळाचा परिणामकारक वापरांची आवश्यकता, अनावश्यक पदे कमी करणे आणि नवीन पद निर्मिती या बाबींचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भेंडवी (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे बांधण्यात आलेले पाण्याची टाकी, शौचालय, हातपंपाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४३) ९३१५६ (२१-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडवी (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायत अंतर्गत तसेच अंबुजा फाउंडेशन व्दारे बांधण्यात आलेली पाण्याची टाकी, शौचालय व सात हातपंपाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-१०-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

अंबुजा फाऊंडेशनद्वारे बांधण्यात आलेले शौचालय, निकृष्ठ दर्जाचे असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले.

तथापि, अस्तित्वातील पाण्याची टाकी सुस्थितीत असून, सदर गावात एकूण १४ सार्वजनिक हातपंपापैकी १३ हातपंप चालू स्थितीत आहेत, तर १ हातपंप बंद आहे.

(२) होय. सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

मौजा भेंडवी येथील वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी ग्रामपंचायत निधीतून रु. २३,२५,६००/-, संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. ८,६६,४००/- असे एकूण ३१,९१,०००/- खर्च करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त अंबुजा फाऊंडेशन उपरवाही यांनी सदर शौचालय बांधकामासाठी ६,८२,०००/- चे साहीत्य पुरवठा केला आहे.

यामध्ये रु.२३,२५,६००/- ची आर्थिक अनियमितता झाल्याचे आढळून आले. त्यानुसार, सदर प्रकरणी तत्कालिन ग्रामसेवक श्री. एम.जे. नागदेवते यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर शहर व तालुका (जि.सोलापूर) येथे नागरिकांना अनेक दुकानदार मालाचे मोजमाप करताना कमी वजन करून माल देत असल्याबाबत**

**(४४) ९३३३८ (२१-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहर व तालुका (जि.सोलापूर) येथे नागरिकांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तू बाजारातून खरेदी करतांना अनेक दुकानदार मालाचे मोजमाप करताना कमी वजन करून माल ग्राहकांना देत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वैधमापन कार्यालयास कोणताही नामफलक नसल्यामुळे तक्रार करायला नागरिकांना कार्यालयाचा शोध घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणी वजन मापे तपासणी मोहिम सुरु करून दोषी दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत व वैधमापन कार्यालयाला नामफलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) या अनुषंगाने तपासणी केली असता, दुकानदार मालाचे मोजमाप करताना कमी वजन करून ग्राहकांना माल देत असल्याचे आढळले नाही. कार्यालयाच्या भाड्याने घेतलेल्या इमारतीसमोर बांधकाम सुरू असल्याने कार्यालयाचा नामफलक तात्पुरत्या कालावधीसाठी काढण्यात आला होता व बांधकाम पूर्ण होताच तो पुर्ववत लावण्यात आला आहे.
(४) या प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात येणाऱ्या साखरेच्या दरामध्ये वाढ केल्याबाबत**

**(४५) ९३८६१ (२१-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थैतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात येणाऱ्या साखरेच्या प्रति किलो दरात तीन रुपये वाढ केली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त दरवाढ गत दीड महिन्यात दुस-यांदा केली असल्यामुळे नागरिक महागाईने त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त साखरेची दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-१०-२०१७) :**(१) व (२) होय.

सार्वजनिक वितरण व्यवस्थैतर्गत राज्यातील पात्र लाभार्थ्यांना साखर वाटप करण्याची योजना केंद्र शासनाकडून मिळणा-या अनुदानावर सुरु आहे. सन २०१३ पासून सी रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार, केंद्र शासनाने लेव्ही शुगर पद्धत बंद केली आहे. त्यामुळे शासनास पात्र लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थैतर्गत अनुदानीत दराने साखर वाटप करावयाचे असल्यास खुल्या बाजारातून साखर खरेदी करावी लागते. केंद्र शासन प्रतिक्विंटल १८५० इतके अनुदान देते. त्यानुसार खुल्या बाजारातील साखरेच्या किंमती विचारात घेता शासनाने दि . ११ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना मिळणारी साखर १३.५० प्रति किलो वरून रु १५ प्रति किलो याप्रमाणे देण्याचा निर्णय घेतला त्यानंतर दि. १५ सप्टेंबर २०१७ च्या शासननिर्णयान्वये लाभार्थ्यांना प्रति किलो रु. १५/- ऐवजी प्रति किलो रु, २०/- याप्रमाणे वाटप केले जात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील मेट्रो रेल्वे प्रकल्प-३ च्या अंतर्गत आझाद मैदान येथील शिधावाटप कार्यालय स्थलांतरीत झाल्याबाबत**

**(४६) ९४२०० (२१-०८-२०१७). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील मेट्रो रेल्वे प्रकल्प-३ च्या अंतर्गत आझाद मैदान येथील शिधावाटप कार्यालय वडाळा येथील मुख्य अभियंता मुंबई पोर्ट ट्रस्ट मार्केट बिल्डींग, पहिला मजला येथे ५७२९ चौरस फुटाची जागा देवून स्थलांतरीत करण्यात येत असल्याची बाब माहे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यायी जागा ही 'ए' विभाग शिधावाटप कार्यक्षेत्राच्या हद्दीतील नागरिकांना पुर्णपणे गैरसोयीची असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिधावाटप कार्यालय 'ए' विभागातील शासकीय इमारतीतील ५७२९ चौरस फुटाच्या जागेमध्ये सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१७) :**(१) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शिधावाटप कार्यालय क्र.१-अ करिता, "मुख्य अभियंता, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मार्केट बिल्डींग, १ ला मजला, वडाळा, मुंबई-३१ येथील जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती.

(२) होय.

(३) नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.६/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये अन्य पर्यायी जागा "सतनाम मेंशन इमारत" २ व ३ रा मजला,२४५ पी.डीमेलो मार्ग,रोल नं.१३९३, केंद्रीय पोस्ट ऑफीसच्या बाजूला, मुंबई -१ येथे उपलब्ध करुन देण्यात आली. दि.५/८/२०१७ पासून या जागेत कार्यालय सुरु आहे.

(४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये "मुख्य अभियंता, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मार्केट बिल्डींग, १ ला मजला, वडाळा, मुंबई-३१ या जागेचे वाटप करण्यात आले होते. ही जागा शिधापत्रिकाधारकांना गैरसोयीची असल्याने, सामान्य प्रशासन विभागाकडे पाठपुरावा केल्यानंतर, त्यांच्या दि.६/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये, वरील जागेऐवजी "सतनाम मेंशन इमारत, केंद्रीय पोस्ट ऑफीसच्या बाजूला,मुंबई -१ ही जागा उपलब्ध करुन देण्यात आली. या जागेत शिधावाटप कार्यालय क्र.१-अ तात्पुरत्या स्वरुपात दि.५/८/२०१७ पासून कार्यरत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील धारणगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४७) ९४५८२ (२१-०८-२०१७). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे धारणगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर योजना पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, उक्त योजना कधीपर्यंत कार्यान्वित होईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सद्य:स्थितीत योजनेचे एकंदरीत ८०% काम पूर्ण झाले आहे. योजनेतील कॅनॉल, हेड रेग्युलेटर, अशुध्द पाणी गुरुत्ववाहिनी व साठवण तलावाची कामे पूर्ण आहेत. सदर योजनेवर माहे ऑगस्ट, २०१७ अखेर रु.४८०.९८ लक्ष इतका खर्च झाला आहे.

योजनेतील अशुध्द पाणी पंप संयंत्र बसविणे, साठवण तलावातील अशुध्द पाणी संप व पंपगृह व तेथून जलशुध्दीकरण केंद्र पर्यंतची उर्ध्ववाहिनी, शुध्द पाणी संप व पंपगृह, शुध्द पाणी उर्ध्ववाहिनी (संप ते MBR) ही कामे अद्याप हाती घेणे बाकी आहे. तसेच योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने उंच जलकुंभ, शुध्द पाणी गुरुत्ववाहिनी, वितरण व्यवस्था, जलशुध्दीकरण केंद्रातील उर्वरित कामे करणे व जलदाब चाचणी घेऊन योजना कार्यान्वित करणे ही कामे करणे आवश्यक आहे. योजनेची शिल्लक तरतूद पाहता योजना पुनर्सुधारित करुन त्यास शासन मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत रु.६८३.७८ लक्ष ढोबळ रकमेची योजना तयार करण्यात आली असून पुढील कार्यवाही चालू आहे.

---

**मौजे रूईखेड टेकाळे (ता.जि.बुलडाणा) येथील स्वस्त धान्य व केरोसिन विक्री परवानाधारकांचा परवाना रद्द करण्यात आल्याबाबत**

**(४८) ९४८३० (२१-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रूईखेड टेकाळे (ता.जि.बुलडाणा) येथील स्वस्त धान्य व केरोसिन विक्री परवाना बनावट चौकशी अहवालाच्या आधारे दिनांक १० जुलै, २०१७ रोजी वा त्य सुमारास रद्द करण्यात आला आह, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नियुक्त चौकशी अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी वस्तुस्थिती दडपूण मोठ्या प्रमाणावर अनियमितता व गैरप्रकार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व चौकशी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

मौजे रुईखेड टेकाळे, ता.जि. बुलडाणा येथील स्वस्त धान्य व केरोसिन परवाने रद्द झाल्यानंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्र.१६४६/२०१० मधील मा.न्यायालयाच्या दि.२४.०९.२०१० च्या आदेशानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलडाणा यांच्या व्यतिरिक्त समकक्ष असलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत तपासणी करुन त्याबाबतचा आदेश पारित करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, मेहकर यांची नियुक्ती करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी, मेहकर तसेच उप आयुक्त (पुरवठा), अमरावती यांचे दि.१५.२.२०१६ रोजीचे आदेशानुसार चौकशी करुन चौकशीअंती आढळून आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलडाणा यांच्या दि.१०.७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये परवानाधारकाचा परवाना रद्द करण्यात आला.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे राहेरा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील पाणीपुरवठा योजनेच्या कंत्राट वाटपात झालेल्या अनियमिततेबाबत

**(४९) ९४८६८ (२१-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे राहेरा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजनेच्या कंत्राट वाटपात अनियमितता झाल्याची बाब दिनांक १० जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कंत्राट ई-टेंडर प्रणालीने असतांना सुध्दा अधिक्षक अभियंता एम.जी.पी. कार्यालय, अकोला यांनी कंत्राटासाठी आवश्यक असलेले दस्तऐवज ई-टेंडर प्रणालीत न सादर केलेली दस्तऐवज कार्यालयात सादर करून घेऊन विशिष्ट कंत्राटदारास सदर पाणी पुरवठा योजनेचे काम मिळविण्याच्या उद्देशाने गैरमार्गाचा अवलंब केला असल्याचे दिनांक ५ जुलै २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच उक्त पाणी पुरवठा योजनेचे कंत्राट रद्द करून नव्याने कंत्राट बोलविण्या बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर योजनेच्या कामाच्या ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार तीन कंत्राटदाराच्या निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी एक कंत्राटदार श्री.ए.बी. शेवळे, बुलडाणा यांनी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे नसल्याने, त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर, निविदा उघडण्यात आल्या.

सदर निविदामध्ये तीनच कंत्राटदार आल्याने, उपकार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र सादर केल्यामुळे निविदा रद्द केली असती, तर दोनच कंत्राटदार शिल्लक राहीले असते व पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया करावी लागली असती व त्यामध्ये बराच कालावधी लागला असता. त्यामुळे श्री.शेवाळे, कंत्राटदार यांचेकडून कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर, निविदेतील लिफाफा क्र.२ (Financial Bid) उघडण्यात आला.

त्याप्रमाणे, सर्वात कमी दराचा देकार निविदेतील अन्य कंत्राटदार श्री. आर.आर. भोजवानी, खामगांव यांचा प्राप्त झाल्याने त्याप्रमाणे निविदा मंजूरीबाबत कार्यवाही करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव ग्रामीण (ता.खामगांव, जि.बुलडाणा) येथील पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५०) ९४९०२ (२१-०८-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव ग्रामीण (ता.खामगांव जि.बुलढाणा) येथील पाणी पुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना पूर्ण होऊन देखील परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१७) :**(१) व (२) नाही.

खामगाव ग्रामीण मधील संजीवनी कॉलनी हा भाग पूर्वी शिरजगांव निळे ग्रामपंचायती अंतर्गत होता. संजीवनी कॉलनीसाठी स्वतंत्र उद्भवावरुन योजना पूर्ण झाली आहे.

तथापि, सदर योजनेच्या उद्भवास मार्च ते जून या कालावधीत पाणी कमी असल्याने, योजनेतून पाणी पुरवठा झाला नाही. तथापि, नागरीकांना उपलब्ध असलेल्या हातपंपावरुन पाणी पुरवठा करण्यात आला. खामगांव ग्रामीण ग्रामपंचायतीसाठी योजना मंजूरीबाबत जिल्हा परिषद स्तरावर टंचाई कार्यक्रमातून योजना घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.